# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

**अपिल क्रमांक ३/२०११**

**सुनावणी दिनांक ८/३/२०११**

श्री जि. वि. राजपूत,
मु कोबापूर, पो. कनकोर
ता. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई

प्रतिवादी

## आदेश

श्री जि.वि.राजपूत, औरंगाबाद यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपिलीय अधिकारी यांच्यापुढे अपिल दाखल केलेले असून, त्यामध्ये असे स्पष्ट केलेले आहे की, माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती न दिल्यामुळे हे अपिल दाखल करण्यात येत आहे. अपिल करणार यांनी दिनांक १२/१२/२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागितलेली होती. आस्थापना शाखेने सदरहू अर्ज दिनांक २०/१२/२०१० रोजी मिळाल्यानंतर, दिनांक ५/१/२०११ च्या पत्रान्वये माहिती जन माहिती अधिकारी यांना दिली होती.

सदरहू माहिती मिळाल्यानंतर, अपिल करणार यांना सदर माहिती दिनांक ६/१/२०११ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेली होती. सदरहू माहिती मिळाल्यानंतर, अपिल करणार यांनी दिनांक ६/२/२०११ च्या पत्रान्वये असे निदर्शनास आणले की, सदरहू

माहिती अपुरी असल्यामुळे अपिल दाखल करण्यात येत आहे. अपिल करणार यांनी खालील मुद्दे उपस्थित केले.

१. मुद्दा क्र.अ मध्ये देण्यात आलेली माहिती अस्पष्ट असून, ती वाचता येत नाही. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी सदरहू माहिती पुन्हा: छायांकित प्रत करुन, त्वरीत सदरहू प्रती अपिल करणार यांना उपलब्ध करुन दिल्या.

२. मुद्दा क्र.ब बाबत अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, हवा प्रदूषण निवारण अभियंता, जल प्रदूषण निवारण अभियंता आणि सहाय्यक सचिव(तांत्रिक) आणि प्रादेशिक अधिकारी या पदांची सन २००० पासून ते आजतागायत प्रमाणित केलेली बिंदू नामावली त्यांनी मागितलेली होती. मात्र, त्यांना अशी प्रमाणित केलेली बिंदू नामावली उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

त्याबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, समाजकल्याण विभागाकडून सन २००० पर्यंत बिंदुनामावली प्रमाणित केली असल्याचे सांगितले. त्यानंतरच्या बिंदुनामावल्या प्रमाणित करुन घेण्याबाबत समाजकल्याण विभागास पत्रव्यवहार केल्याचे सांगितले. तरी आस्थापना शाखेकडे सन २००० नंतर वरील पदांच्या बिंदु नामवल्या प्रमाणित केलेल्या नसल्यामुळे, आस्थापना शाखेने तयार केलेल्या सदरहू पदांच्या बिंदुनामावल्या उपलब्ध करुन दिल्या. सदरहू अनुशेष दर्शविणारा तक्ता आस्थापना शाखेने प्रमाणित करुन देण्याचे मान्य केलेले आहे.

३. मुद्दा क्र.ब मधील क्र.५,६ व ७ मध्ये नमूद करण्यात आलेली पदे एकत्र करण्याचे अधिकार कोणास आहेत, याबाबत विचारणा केली होती. अपिल करणार यांना त्याबाबत कोणास अधिकार आहेत याची माहिती दिली नाही, असे अपिल करणार यांचे म्हणणे आहे.

त्याबाबत आस्थापना शाखेस विचारणा केली असता असे स्पष्ट करण्यात आले की, प्रकरण-१(अ)-छोटे संवर्ग व एकाकी पदे यांचे गट करणे व एकाकी पदास आरक्षण ठेवण्याबाबत, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी.१०६४-चार-जे, दिनांक १६/४/१९६५ मध्ये असणा-या तरतुदींनुसार एकाच विभागातील, एकाच वर्गाखालील आणि समान दर्जा, वेतन व अर्हता असलेली विविक्त (एकाकी) पदे व छोटे संवर्ग यांच्या मागास वर्गातील लोकांकरिता रिकामी पदे राखून ठेवण्याच्या दृष्टीने एक गट करण्यात यावा, ज्यामध्ये २० पदांपेक्षा कमी असलेला संवर्ग अथवा सेवाश्रेणी ही छोटा संवर्ग म्हणून मानण्यात यावी अशा त-हेने तयार करण्यात आलेल्या गटामध्ये सर्वसाधारणत: २५ पेक्षा कमी पदे नसावीत, अशी तरतुद आहे, त्याचा आधार घेतलेला आहे.

त्यामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले असल्याचे अपिल करणार यांनी निदर्शनास आणले की, पदांचे गट करण्यासंबंधीचे प्रस्ताव, संबंधीत प्रशासकीय विभागांनी मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे (बी.सी. सेल) पाठवावेत, याचे पालन न केल्याचे निदर्शनास आणून दिले.

४. मुद्दा क्र.ब मधील क्र.१० मध्ये, हवा प्रदूषण निवारण अभियंता, जल प्रदूषण निवारण अभियंता आणि सहाय्यक सचिव(तांत्रिक), मप्रनि मंडळ ही पदे एकाकी असताना, सदर पदांना कोणत्या आधारे आरक्षण लावण्यात आले आहे, हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. तसेच, त्यामध्ये अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६ ब, दिनांक ५/११/२००९ च्या निर्णयातील प्रपत्र-ब नुसार अशा एकाकी पदांस आरक्षण लागू होत नाही.

तरी आस्थापना शाखेने याबाबत १५ दिवसांच्या आत अर्जदारास माहिती द्यावी. तसेच आस्थापना शाखेने असे स्पष्ट केले की, मप्रनि मंडळाच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये जल प्रदूषण निवारण अभियंता व हवा प्रदूषण निवारण अभियंता यांचे पदोन्नतीबाबतचे एकच नियम आहेत व सहाय्यक सचिव(तांत्रिक), जल प्रदूषण निवारण अभियंता व हवा प्रदूषण निवारण अभियंता ही पदे समान वेतन, समान अर्हता असल्यामुळे सदर पदांचा एक संच करुन, त्यांना आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. सदर इतिवृत्ताची प्रत अपिल करणार यांना देण्यात येत आहे. त्यावरुन आस्थापना शाखेने सांगितल्याप्रमाणे, पदोन्नती समितीने सदरहू पदे एकत्र करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे व सदरहू आदेश अपिल करणार यांच्यासमक्ष टंकलिखित करण्यात आले.

दिनांक ८/३/२०११ रोजी मुंबई येथून.

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी